# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 21.04.2024** **रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **लोकसभा निवडणुकीच्या पुढील टप्प्यातील मतदान आणखी वाढवण्याचं पंतप्रधानांचं मतदारांना आवाहन.**
- **स्वीप अंतर्गत मतदार जनजागृतीसाठी राज्यभर विविध कार्यक्रमांचं आयोजन.**
- **तिसऱ्या टप्प्यासाठीच्या उमेदवारी अर्जांची छाननी पूर्ण.**
- **नव्या फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचं सरन्यायाधीशांनी केलं स्वागत.**

**आणि**

- **राज्याच्या विविध भागांत पावसाची हजेरी.**

**नांदेड**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबाबत समाधान व्यक्त केलं, तसंच मतदानाचं प्रमाण वाढवत नेण्याचं आवाहनदेखील केलं. नांदेड इथं एका प्रचारसभेत ते काल बोलत होते. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांनीही लोकशाहीसाठी सातत्याने काम करत राहण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. लाखो महिलांना शौचालयाची सुविधा, गरिबांसाठी बँक खाती, डिजिटल इंडिया मोहीम, यूपीआय तंत्रज्ञान यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारनं केलेल्या कामांचा उल्लेख त्यांनी केला. काँग्रेसने यूपीआय, नागरिकत्व सुधारणा कायद्याला केलेला विरोध, तसंच महाराष्ट्राकडे केलेलं कथित दुर्लक्ष आणि यामुळे शेतकऱ्यांचं नुकसान, औद्योगिक समस्या, मराठवाड्यातलं स्थलांतर इत्यादी मुद्द्यांवरून पंतप्रधानांनी काँग्रेसवर निशाणा साधला.

**परभणी**

नांदेडच्या सभेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परभणीत सभा घेतली. गेल्या दशकात 'सब का साथ, सब का विकास' या धोरणासह सर्वसमावेशक विकासाप्रती राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारची कटिबद्धता आणि दहशतवादाला बसलेला आळा त्यांनी अधोरेखित केला, तसंच हा प्रवास असाच सुरू राहणार असल्याची ग्वाही दिली. दारिद्र्य, तसंच रेशनचं न्याय्य वाटप यासाठी आपलं सरकार काम करत असल्याचंही मोदी म्हणाले. तिसऱ्यांदा निवडून आल्यास प्रलंबित प्रकल्प सुरू ठेवण्याचं आणि पूर्ण करण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं. परभणीमध्ये १७ जनऔषधी केंद्रांच्या माध्यमातून सवलतीच्या दरात औषधं देणं, उज्ज्वला योजनेअंतर्गत २५ हजारापेक्षा जास्त महिलांना लाभ मिळवून देणं, नऊ

लाखांपेक्षा जास्त पशुधनाचं लसीकरण इत्यादीतून जनकल्याणाप्रती सरकारची कटिबद्धता दिसून येते असं प्रतिपादन मोदी यांनी केलं. मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेकडे काँग्रेसच्या सरकारांनी दुर्लक्ष केल्याची टीका पंतप्रधानांनी केली.

**आदित्यनाथ**

दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची अकोल्यातली सभा रद्द करण्यात आली.

**औरंगाबाद मतदारसंघ**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी औरंगाबाद मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवाराची घोषणा काल करण्यात आली. जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे शिवसेनेकडून निवडणुकीच्या रिंगणात असतील.

**मतदार जागृती**

अमरावती लोकसभा मतदारसंघात २६ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेत नागरिकांनी जिल्ह्याच्या विकासासाठी स्वयंस्फूर्तीने मतदान करावं, असं आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केलं. धुळे जिल्ह्यात स्वीप अंतर्गत धुळे शहर विधानसभा मतदारसंघ, अप्पर तहसील कार्यालय, धुळे शहर, तसंच धुळ्यातल्या मातोश्री गुंताबाई आखाडे बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विविध ठिकाणी मतदार जागृती कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. मतदान प्रतिज्ञेचं वाचनही यावेळी करण्यात आलं. वाशीम-यवतमाळ लोकसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी समाजातल्या सर्वच घटकांनी प्रयत्न करावेत, असं आवाहन जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. यांनी काल पत्रकार परिषदेत केलं. जिल्ह्यातल्या मतदानामध्ये महिलांची टक्केवारी कमी असल्याच्या बाबीकडेही त्यांनी लक्ष वेधलं. तसंच आपला हक्क बजावण्याचं आवाहन त्यांनी महिलांना केलं. सिंधुदुर्ग इथं मतदार जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या दोन एलईडी चित्ररथांना जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी किशोर तावडे यांनी काल हिरवा झेंडा दाखवला. या रथाद्वारे मतदार जनजागृतीच्या चित्रफिती, छोटी संगीतकं, अर्थात जिंगल्स दाखवण्यात येणार आहेत. मुंबई आणि उपनगरांमध्येही स्वीपच्या माध्यमातून भारूड लोककला आणि शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचं आयोजन करून मतदारांना आपलं कर्तव्य बजावण्याचं आवाहन करण्यात येत आहे. कवितालेखन, वाचन, गायन, रांगोळी स्पर्धा, मतदानाचा संकल्प, समाजमाध्यमांवरच्या मोहिमा असे विविध कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**अर्ज छाननी**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी राज्यातल्या लोकसभा मतदारसंघांमध्ये दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी काल पार पडली.

साताऱ्यात एकंदर २४ उमेदवारांनी ३३ अर्ज दाखल केले होते. पैकी २१ अर्ज वैध ठरल्याची, तर तीन अर्ज अवैध ठरवण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

रायगडमध्ये २८ उमेदवारांनी दाखल केलेल्या ४० उमेदवारी अर्जांपैकी २१ उमेदवारांचे २७ अर्ज वैध ठरवण्यात आले, तर ७ उमेदवारांचे १३ अर्ज अवैध ठरवण्यात आल्याचं निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी सांगितलं.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात दाखल झालेले सर्व उमेदवारी अर्ज वैध ठरले.

सांगली मतदारसंघात काल पार पडलेल्या छाननीत २५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरवण्यात आले.

हातकणंगले मतदारसंघासाठी ३२ उमेदवारांचे ५० अर्ज वैध ठरवण्यात आले, तर ५ अर्ज अवैध ठरले.

कोल्हापूरमध्ये २७ उमेदवारांचे ३९ अर्ज स्वीकारण्यात आले, तर २ उमेदवारांचे ३ अर्ज अवैध ठरवण्यात आले.

सांगलीत २५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.

लातूर लोकसभा मतदारसंघात ३६ उमेदवारांनी दाखल केलेल्या ५० अर्जांपैकी ५ अर्ज अवैध ठरले, तर ३१ अर्ज वैध ठरवण्यात आले.

**अर्ज मागे**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. याअंतर्गत कालच्या तिसऱ्या दिवशी बीड लोकसभा मतदारसंघात दुपारी तीन वाजेपर्यंत ११ उमेदवारांनी २५ अर्ज मागे घेतले. पहिल्या दिवशी ३९ उमेदवारांनी ९२, तर दुसऱ्या दिवशी ३० उमेदवारांनी ६८ अर्ज मागे घेतले होते. तीन दिवसांत एकंदर ८० उमेदवारांनी १८५ उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.

**सरन्यायाधीश**

नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी हे देशात होत असलेल्या परिवर्तनाचं आणि देश पुढे जात असल्याचं द्योतक असल्याचं प्रतिपादन भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी काल नवी दिल्लीत एका परिषदेला संबोधित करताना केलं. या कायद्यांमुळे फौजदारी न्याय प्रक्रियेत अमूलाग्र बदल होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गुन्हेगारी खटल्यांवर प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग होऊ शकतो, असंही त्यांनी सांगितलं.

**मतदार सहाय्यता क्रमांक**

केंद्रीय निवडणूक आयोगानं जारी केलेल्या, १८००-२२१-९५० या मतदार सहाय्यता क्रमांकावर १८ एप्रिलपर्यंत ७ हजार ३शे १२ लोकांनी संपर्क केल्याची आणि त्यांना आवश्यक ती माहिती आणि मदत देण्यात आल्याचं अवर सचिव आणि उपमुख्य निवडणूक अधिकारी शरद दळवी यांनी सांगितलं. राज्यात यापैकी सर्वाधिक, म्हणजे १ हजार ५ शे ७५ फोनची नोंद मुंबई उपनगरातून झाल्याचंही त्यांनी नमूद केलं. मतदारांना हवी ती माहिती देण्यासाठी २४ तास मनुष्यबळ तैनात करण्यात आलं असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं कळवलं आहे.

**अकोला तापमान**

अकोला इथं शुक्रवारी ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सलग दुसऱ्या दिवशी विदर्भातलं सर्वाधिक तापमान अकोल्यात नोंदवण्यात आलं. एप्रिल महिन्यात एकीकडे पाऊस आणि दुसरीकडे कडक उन्हाचे चटके अकोलेकरांना बसत आहेत. गुरुवारी इथलं तापमान ४३ पूर्णांक ३ अंश सेल्सिअस होतं. दुसऱ्या दिवशीही पारा चढलेलाच राहिला.

**पाणी टंचाई**

पालघर जिल्ह्यात वाढत्या तापमानासोबतच पाणीटंचाईच्याही झळा अनेक भागांना बसत आहेत. जव्हार, मोखाडा, वाडा आणि विक्रमगड तालुक्यांमध्ये पाणीटंचाई भासत आहे. अनेक जलस्त्रोतांमधलं पाणी आटल्यामुळे इथल्या गावपाड्यांना टँकरनं पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जिल्ह्यातल्या १९ गावांमधल्या ७३ पाड्यांमध्ये पाणीटंचाईची समस्या भीषण असल्यानं इथले नागरिक आणि पशुधनाला टँकरमधून पाणी पोहोचवण्यात येत आहे.

**पाऊस नाशिक**

नाशिक जिल्ह्यात उन्हाचा तडाखा वाढत असतानाच दोन दिवसांपूर्वी जिल्ह्याच्या काही भागांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावल्यामुळे ७ शे २९ हेक्टर जमिनीवरच्या शेतपिकांचं नुकसान झालं आहे. यात ६ शे ४९ हेक्टर क्षेत्रावरचा आंबा, ७१ हेक्टर कांदा, तर साडेआठ हेक्टर क्षेत्रावरच्या भाजीपाल्याच्या पिकाचा समावेश असल्याची माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली आहे. सुरगाणा तालुक्यात सर्वाधिक, म्हणजे ५ शे २ हेक्टरवरच्या पिकाला अवकाळीचा फटका बसला आहे. दोन दिवसांपूर्वी पेठ, सुरगाणा आणि त्र्यंबकेश्वर पट्ट्याला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपून काढलं. याचा फटका १ शे ७ गावांना बसला आहे, तसंच काही ठिकाणी घरांचीही पडझड झाली आहे. यामुळे एकंदर ३ हजार ५ शे १८ शेतकरी बाधित झाले असल्याची माहिती कृषी विभागाच्या अहवालात देण्यात आली आहे.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागांना काल पावसानं झोडपलं. सोलापूर जिल्ह्यात संध्याकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसानं रस्त्यांवर पाणी साचलं. तसंच अक्कलकोट तालुक्यातल्या दोन गावांपर्यंतची वाहतूकही बंद पडली. धाराशीव जिल्ह्यातही पावसानं जोरदार हजेरी लावली. यामुळे आंबा, तसंच रबी हंगामात काढणीला आलेल्या ज्वारीचं नुकसान झाल्याचं वृत्त आहे. तुळजापूर शहरातल्या तुळजाभवानी मंदिर परिसरात पाणी वाहून आल्यानं भाविकांची तारांबळ उडाली. नांदेड शहर आणि परिसरातही काल संध्याकाळी वादळी वाऱ्यासह मध्यम पाऊस झाला. लातूर शहर आणि परिसरात दुपारी साडेतीनच्या आसपास अचानक वातावरण बदललं आणि तासभर पावसाने हजेरी लावली. यामुळे आंबा पिकाचं मोठं नुकसान झालं.

**हवामान**

राज्यात काल बहुतांश ठिकाणी वादळी वाऱ्यासह मध्यम किंवा जोरदार पावसानं हजेरी लावली. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची, तसंच वीजा आणि सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**